महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
शिवाजीनगर, पुणे ४११००४

लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद
व
माहिती पुस्तिका

भारतीय संविधानानुसार नागरिकांची मूलभूत कर्तव्य

(क) संविधानाचे पालन करणे आणि ततप्रणीत आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे

(ख) ज्यामुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्यलढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शाची जोपासना करून त्यांचे अनुसरण करणे.

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत राखणे व त्यांचे संरक्षण करणे.

(घ) आवाहन केले जाईल तेव्हा देशाचे संरक्षण करणे व राष्ट्रीय सेवा बजावणे.

(ड) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन अखिल भारतीय जनतेमध्ये एकोपा व भ्रातृभाव वाढीला लावणे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथा सोडून देणे.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे मोल जाणून तो जतन करणे.

(छ) अरण्ये, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी या नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करून त्यात सुधारणा करणे आणि सजीव प्राण्यांबाबत दयाबुद्धी बाळगणे.

(ज) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे.

(झ) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे.

(त्र) राष्ट्र सतत उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशाप्रकारे सर्व व्यक्तिगत व सामुदायिक कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे, हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य असेल.

भारताचे संविधान

प्रास्ताविका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस;

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास श्रद्धा
व उपासना यांचे स्वातंत्र्य ;

दर्जाची व संधीची समानता ;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

प्रस्तावना

लोकशाहीनिष्ठ कार्यपद्धतीमध्ये प्रशासनातील लोकाभिमुखतेला अतिशय महत्त्व आहे. सर्वसामान्य माणसांच्या कल्याणासाठी घेतलेले निर्णय व त्यांची अंमलबजावणी, सर्वांना कळाली पाहिजे. समाज– जीवनातील शिक्षणासारख्या बहुस्पर्शी महत्त्वाच्या क्षेत्राच्या बाबतीत तर ही विशेष महत्त्वाची गरज आहे. प्रशासनातील पारदर्शिकतेलाही महत्त्व आहे. राज्यव्यवहारात सहभागी झालेल्या विविध शासकीय संस्थांची कार्ये व त्यांची कार्यपद्धती सर्वसामान्य माणसांना ज्ञात असली पाहिजे. त्यामुळे समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती येईल. विकासातील अडथळे दूर होण्यास मदत होईल. या उद्देशाने 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळा' कडून लोकाभिमुख प्रशासन – नागरी सनद ही पुस्तिका नोव्हेंबर २००५ मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. मंडळामधील काही कार्यपद्धतीत झालेल्या बदलानुसार ती अद्ययावत करून पुन:श्च प्रकाशित करण्यात येत आहे.

माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण या संदर्भातील परीक्षा पद्धती व परीक्षांचे व्यवस्थापन इत्यादी विषयांशी संबंधित महत्त्वपूर्ण कार्य हे मंडळ पार पाडीत आहे. त्याचबरोबर शिक्षक–प्रशिक्षण व शैक्षणिक उपक्रमशीलतेला प्रोत्साहन देणे यासारख्या बाबींनाही मंडळ अग्रक्रम देते. माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षांचा कारभार विभागीय मंडळांच्या माध्यमातून राज्यमंडळ चालविते. गोपनीयता, विश्वासार्हता आणि वैधता या दृष्टिकोनातून या परीक्षांचे संचालन करणे ही एक महत्त्वाची जबाबदारी राज्यमंडळ पार पाडते.

मंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा, त्या किती अवधीत पुरविल्या जातील, त्या कोणामार्फत पुरविल्या जातील, सेवापूर्तीसाठी कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे इत्यादी माहितीचा अंतर्भाव या पुस्तिकेत करण्यात आला आहे. सर्वसाधारणपणे आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून ती भाग–२ मध्ये देण्यात आली आहे. या माहितीचा शाळा, विद्यार्थी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापक या संबंधितांना निश्चितच उपयोग होईल.

ही सर्व कार्ये जनसामान्यांना परिचित व्हावी, कामे करताना सुलभता यावी आणि त्यातून व्यापक शिक्षणहित साधले जावे, यासाठी ही पुस्तिका तयार केली आहे. शिक्षण– क्षेत्राशी संबंधित सर्वांनाच ही पुस्तिका उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

डॉ. त्रिगुण कुलकर्णी (भा.प्र.से)

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक

शिक्षण मंडळ, पुणे

अनुक्रमणिका

सनद क्र	सेवेचा प्रकार	निर्गत कालावधी	सक्षम कार्यालय	पृष्ठ क्र
१.	माध्यमिक शाळांना मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक देणे	२१ दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१ – ३
२.	उच्च माध्यमिक शाळांना मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक देणे	२१ दिवस	संबंधित विभागीय मंडळ	४ – ६
३.	माध्यमिक शाळांतील अतिरिक्त माध्यमांना मान्यता	६० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	७
४.	उच्च माध्यमिक शाळांतील अतिरिक्त माध्यमांना मान्यता	६० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	८
५.	उच्च माध्यमिक शाळांना अतिरिक्त विषयांना मान्यता	६० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	९
६	माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांना खाजगीरीत्या प्रविष्ट होण्यासाठी नावनोंदणी प्रमाणपत्र देणे.	६० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१०–१२
७	परीक्षा– केंद्र मान्यता	६० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१३
८	माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी आवेदनपत्रे सादर	परीक्षेपूर्वी १० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१४
९.	उत्तीर्णतेचे तात्पुरते प्रमाणपत्र देणे	निकालानंतर १५ दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१५
१०.	गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रती	निकालानंतर अर्ज केल्यापासून	संबंधित विभागीय मंडळ	१६
११.	प्रमाणपत्राची द्वितीय प्रत	३ ते ७ दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१७
१२.	गुणपत्रिकेची द्वितीय प्रत	३ ते ७ दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१८
१३.	प्रमाणपत्र तथा गुणपत्रिकेतील नोंदी दुरुस्त करणे (नाव, जन्म तारीख)	१५ दिवस	संबंधित विभागीय मंडळ	१९
१४	परीक्षेसाठी केंद्र बदल / विभाग बदल	३० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	२०
१५.	दिव्यांग विद्यार्थांना लागू असलेल्या गुणांमधील व इतर सवलती	३० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	२१
१६.	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी, स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे गुण देण्याबाबत	मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार	संबंधित विभागीय मंडळ	२२

१७.	आजारपणामुळे परीक्षेस प्रविष्ट न झाल्यास परीक्षा शुल्क परत मिळणे बाबत	३० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	२३
१८.	माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अतिरिक्त स्वतंत्र विषय घेऊन परीक्षेस बसणे.	परीक्षेपूर्वी १० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	२४
१९.	प्रमाणपत्र/ गुणपत्रिका पडताळणी	३० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	२५
२०.	शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रांत प्रावीण्य मिळवणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थांना सवलतीचे गुण मिळणेबाबत.	मंडळाने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार	संबंधित विभागीय मंडळ	२६
२१.	माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांशी सबंधित सांख्यिकीय माहिती	७ ते १५ दिवस	संबंधित विभागीय मंडळ	२७
२२.	मंडळ प्रकाशने उपलब्धता	त्वरित	संबंधित विभागीय मंडळ	२८
२३.	उच्च माध्यमिक परीक्षांसाठी समकक्षता / योग्यता प्रमाणपत्र (इ.११ वी)	६० दिवस	राज्यमंडळ	२९
२४.	उच्च माध्यमिक परीक्षांसाठी समकक्षता / योग्यता प्रमाणपत्र (इ.१२ वी)	६० दिवस	संबंधित विभागीय मंडळ	३०
२५	ऑनलाईन सेवा			३१-३२
२६	मंडळाची सर्वसाधारण माहिती	.....	.....	३३-५९
२७	परीक्षा/ विविध प्रकारचे शुल्क			६०-६२
२८	राज्य मंडळ व विभागीय मंडळे संपर्क माहिती			६३-६४
२९	समकक्षता यादी			६५-९२

परीक्षा विभाग

नागरी सनद ०१	**माध्यमिक शाळांना प्रथम मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक देणे.**
१) सेवेचे नाव	विभागीय मंडळाकडून माध्यमिक शाळांना प्रथम मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक देणे.
२) आवश्यकता	विभागीय मंडळांच्या विशेषाधिकाराचा लाभ मिळविण्यासाठी व अंतिम परीक्षेस (माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा) उमेदवार पाठविण्यासाठी माध्यमिक शाळांना प्रथम मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक मिळणे आवश्यक असते. तसेच दरवर्षी विद्यार्थिसंख्येनुसार विहित शुल्क भरून मान्यतेचे नूतनीकरण करणे आवश्यक असते.
३) कोणत्या कायद्यानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक २८
४) कोणत्या कार्यालयांशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळे (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा? अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	मंडळ नियमावली मधील विनियमांसोबत असलेल्या नमुना एक नुसार मंडळाच्या संकेतस्थळावर Online पद्धतीने अर्ज करावा. ज्या वर्षी विद्यार्थी अंतिम परीक्षेसाठी पाठविण्यात येणार आहेत, त्या वर्षीच्या दोन वर्षे अगोदरच्या १५ जुलैपेक्षा उशिरा नसेल अशा तारखेपर्यंत (सहा महिने कालावधीपर्यंतचा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार विभागीय मंडळ अध्यक्षांना असतील तसेच अधिक विलंब असल्यास गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष, राज्य मंडळ यांना आहेत.)
	अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे
	१. शासन मान्यता पत्र (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत) मान्यता पत्र व इरादा पत्र
	२. सदर माध्यमिक शाळेस मंडळ संलग्नता आणि सांकेतिक क्रमांक देण्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे शिफारस पत्र (मूळ प्रत)
	३. शिक्षणाधिकाऱ्यांचा तपासणी अहवाल (मूळ अथवा साक्षांकित प्रत) तसेच सांकेतिक क्रमांक देण्याबाबत शिफारस पत्र (साक्षांकित प्रत)
	४. निबंधक १८६० नोंदणी पत्र (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत)
	५. धर्मादाय आयुक्त कार्यालय १९५० नोंदणी पत्र (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत)
	६. माध्यमिक (इ.१० वी) साठी २८(१) नमुन्यातील अर्ज (मूळ प्रत)
	७. संस्थेची घटना व पदाधिकारी यादी (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत), संस्थेचे नाव व पत्ता
	८. इमारत नकाशा (ब्लू प्रिंटची संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत) व इमारतीचा एक फोटो शाळेची इमारत भाडे तत्वावर आहे का? मालकीची आहे ? भाडे तत्वावर असल्यास रु. ५००/- च्या स्टँप पेपरवर हमीपत्र आहे का?

	९. मुख्याध्यापक मान्यता/स्वाक्षरीचे अधिकार देण्याबाबतचे शिक्षणाधिकारी यांचे पत्र (मूळ प्रत)
	१०. मंडळाशी पत्रव्यवहार करण्यासाठी सचिव किंवा संपर्काधिकारी नियुक्तीचा संस्थेचा ठराव (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	११. इ. ८वी, इ.९ वी, व इ.१० वी मान्यता (शिक्षण उपसंचालक कार्यालय) पत्राची प्रत
	१२. प्रयोगशाळा सुसज्ज असल्याबाबतचे हमीपत्र व प्रयोगशाळेचा एक फोटो (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१३ शिक्षक माहिती–शैक्षणिक पात्रता आणि अध्यापन करत असलेल्या विषयांसह यादी (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१४. संस्थेच्या उत्पन्नाच्या साधनांची माहिती (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१५. संस्थेच्या खाती असलेल्या रक्कमेचा अद्ययावत तपशील (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित पासबुक प्रत / बँक बॅलन्स सर्टिफिकेट)
	१६. मंडळाच्या नियमावलीचे पालन करण्याचे संस्थेचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१७. अनधिकृत शाळा चालवत नसल्याचे संस्थेचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१८. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नसल्याचे रु.१००/– च्या स्टँप पेपरवर हमीपत्र. (मूळ प्रत)
	१९. संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही, असे हमीपत्र. (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२०. संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत नाही / तक्रार नाहीत किंवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेतल्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही, याचे हमीपत्र. (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२१. संस्थेने शाळा सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नसल्याचे संस्थेचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२२. संस्थेने मागील तीन वर्षांची प्रमाणित केलेली लेखा विवरणपत्रे सादर केली असल्याचे पत्र (सोबत लेखा विवरणपत्राच्या साक्षांकित प्रती). (Audit Report)

	२३. कोणताही शिक्षक, विद्यार्थी, गैरप्रकार करणार नाही याचे संस्थेच्या लेटरहेडवर हमीपत्र (संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२४. शाळेमध्ये लाईट, फॅन, जनरेटर / इन्व्हर्टर व्यवस्थेबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत) तसेच परिसरात व सर्व वर्ग खोल्यात CCTV यंत्रणा असल्याचे हमीपत्र
	२५. फेब्रुवारी – मार्च व जून–जुलै परीक्षेसाठी शाळेपासून सर्वात जवळचे केंद्र याबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)ज्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत त्या केंद्राचे संमतीपत्र आहे/नाही.
	२६. संपर्कासाठी संस्थेचा दूरध्वनी क्रमांक व शाळेचा दूरध्वनी क्रमांक, प्राचार्य व लिपिक मोबाईल क्रमांक, शाळेचा ई–मेल आयडी
	२७. मंडळाच्या परीक्षेसाठी विनामूल्य इमारत, फर्निचर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबत हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२८. माध्यमिक शाळा युडायस क्रमांक तपशील / शाळेचा पूर्ण पत्ता पिनकोडसह
	२९. Rainwater harvesting, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहामध्ये नळाची सोय आवश्यक
	३०. खेळ व शारीरिक शिक्षणाच्या सोयी (अ) क्रीडांगण (ब) आरोग्य (क) ग्रंथालय आहे/नाही.
	३१. नैसर्गिक वाढीचे इ.९वी/१०वी चे पत्र आहे/नाही.
	३२. मागणी केलेले माध्यम व विषय कोणते?
	३३. ज्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत त्या केंद्राचे संमतीपत्र आहे/नाही.
टीप: सर्व हमीपत्रे संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीच्या मूळ प्रती असाव्यात. (मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीच्या नसाव्यात.)	
६) अर्ज कोठे सादर करावा ?	मंडळाच्या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज करावा . विभागीय सचिव (संबंधित) विभागीय मंडळ– (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्थात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी?	२१ दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, (राज्य मंडळ) पुणे–४११००४

नागरी सनद ०२	उच्च माध्यमिक शाळांना (कनिष्ठ महाविद्यालयांना) प्रथम मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक देणे.
१) सेवेचे नाव	विभागीय मंडळांकडून उच्च माध्यमिक शाळांना (कनिष्ठ महाविद्यालयांना)प्रथम मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक देणे
२) आवश्यकता	विभागीय मंडळाच्या विशेषाधिकाराचा लाभ मिळविण्यासाठी व अंतिम परीक्षेस (उच्च माध्यमिक प्रमाणपत्र) उमेदवार पाठविण्यासाठी मान्यता मिळवू इच्छिणाऱ्या उच्च माध्यमिक शाळांना (कनिष्ठ महाविद्यालयांना)प्रथम मंडळ व मान्यता व सांकेतिक क्रमांक मिळणे आवश्यक असते.
३) कोणत्या कायद्यानुसार / नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६६ प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	मंडळ नियमावलीतील विनियमांसोबत असलेल्या परिशिष्ट एक प्रमाणे मंडळाच्या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज करावा. ज्यावर्षी विद्यार्थी अंतिम परीक्षेसाठी पाठविण्यात येणार आहेत त्या वर्षाच्या आधी एक वर्ष,१५ जुलैपेक्षा उशिराची नसेल अशा तारखेपर्यत (सहा महिने कालावधी पर्यंतचा विलंब विभागीय अध्यक्ष क्षमापित करू शकतील. अधिक विलंब असल्यास गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष राज्यमंडळ यांना आहे.)
	अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे –
	१. शासन मान्यता पत्र (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत) मान्यता पत्र व इरादा पत्राची प्रत
	२. सदर कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ संलग्नता आणि सांकेतिक क्रमांक देण्याबाबत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे शिफारस पत्र (मूळ प्रत)
	३. शिक्षणाधिकारी तपासणी अहवाल (मूळ अथवा साक्षांकित प्रत) / शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचे शिफारस पत्र (साक्षांकित प्रत)
	४. निबंधक १८६० नोंदणी पत्र (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत)
	५. धर्मादाय आयुक्त कार्यालय १९५० नोंदणी पत्र (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत)
	६. उच्च माध्यमिक (इ.१२ वी) साठी ६६(२) नमुन्यातील अर्ज (मूळ प्रत)
	७. संस्थेची घटना व पदाधिकारी यादी (महिला ३० टक्के असणे आवश्यक) (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत)संस्थेचे नाव व पत्ता
	८. इमारत नकाशा (ब्लू प्रिंटची संस्था सचिवांद्वारा साक्षांकित प्रत) व इमारतीचा एक फोटो कनिष्ठ महाविद्यालयाची इमारत भाडे तत्वावर आहे का? मालकीची आहे ? भाडे तत्वावर असल्यास रु.५००/- च्या पेपरवर हमीपत्र आहे का ?

	९. प्राचार्य मान्यता/स्वाक्षरीचे अधिकार देण्याबाबतचे शिक्षणाधिकारी यांचे पत्र (मूळ प्रत)
	१०. मंडळाशी पत्रव्यवहार करण्यासाठी सचिव किंवा संपर्काधिकारी नियुक्तीचे संस्थेचे ठरावपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	११. इ. ११वी, इ. १२ वी मान्यता (शिक्षण उपसंचालक कार्यालय) पत्राची प्रत
	१२. प्रयोगशाळा सुसज्ज असल्याबाबतचे हमीपत्र व प्रयोगशाळेचा एक फोटो (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१३. शिक्षक माहिती–शैक्षणिक पात्रता आणि अध्यापन करत असलेल्या विषयांसह यादी (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१४. संस्थेच्या उत्पन्नांच्या साधनांची माहिती (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१५. संस्थेच्या खाती असलेल्या रक्कमेचा अद्ययावत तपशील (संस्था सचिवांद्वारा साक्षांकित पासबुक प्रत / बँक बॅलन्स सर्टिफिकेट) १६. मंडळाच्या नियमावलीचे पालन करण्याचे संस्थेचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	१७. अनधिकृत कनिष्ठ महाविद्यालय चालवत नसल्याचे संस्थेचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची (मूळ प्रत)
	१८. संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नसल्याचे रु.१०० /– च्या स्टँप पेपरवर हमीपत्र (मूळ प्रत)
	१९.संस्थेने चालविलेल्या कनिष्ठ महाविद्यालय पैकी एखाद्या कनिष्ठ महाविद्यालयाची मान्यता काढून घेतलेली नाही, असे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२०. संस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत नाही/तक्रारी नाहीत किंवा संस्थेने चालविलेले कनिष्ठ महाविद्यालय शासनाने ताब्यात घेतल्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही, याचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२१. संस्थेने कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नसल्याचे संस्थेचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२२. संस्थेने मागील तीन वर्षांची प्रमाणित केलेली लेखा विवरणपत्रे सादर केली असल्याचे पत्र (सोबत लेखा विवरणपत्रांच्या (Audit Report) साक्षांकित प्रती)
	२३. कोणताही शिक्षक, विद्यार्थी, गैरप्रकार करणार नाही याचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)

	२४. कनिष्ठ महाविद्यालयामध्ये लाईट, फॅन, जनरेटर / इन्व्हर्टर व्यवस्थेबाबत हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत) तसेच परिसरात व सर्व वर्गखोल्यांमध्ये CCTV यंत्रणा असल्याचे हमीपत्र.
	२५. फेब्रुवारी-मार्च व जून-जुलै परीक्षेसाठी कनिष्ठ महाविद्यालयापासून सर्वात जवळचे केंद्र याबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत ज्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत त्या केंद्राचे संमतीपत्र आहे/नाही.
	२६. संपर्कासाठी संस्थेचा दूरध्वनी क्रमांक व कनिष्ठ महाविद्यालयाचा दूरध्वनी क्रमांक, प्राचार्य व लिपिक मोबाईल क्रमांक कनिष्ठ महाविद्यालयाचा ई-मेल आय.डी.
	२७. मंडळाच्या परीक्षेसाठी विनामूल्य इमारत, फर्निचर, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीची मूळ प्रत)
	२८. कनिष्ठ महाविद्यालय युडायस क्रमांक तपशील / कनिष्ठ महाविद्यालयाचा पूर्ण पत्ता पिनकोडसह
	२९. Rainwater harvesting, पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहमध्ये नळाची सोय आवश्यक
	३०. खेळ व शारीरिक शिक्षणाच्या सोयी (अ) क्रीडांगण (ब) आरोग्य (क) ग्रंथालय आहे/नाही.
	३१. नैसर्गिक वाढीचे इ.११वी चे पत्र आहे/नाही.
	३२. मागणी केलेले माध्यम व विषय कोणते?
	३३. ज्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत त्या केंद्राचे संमतीपत्र आहे/ नाही.
टीप - सर्व हमीपत्रे संस्थेच्या लेटरहेडवर संस्था सचिवांच्या स्वाक्षरीच्या मूळ प्रती असाव्यात (प्राचार्याच्या स्वाक्षरीच्या नसाव्यात) माहिती तंत्रज्ञान विषयासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.	
६) अर्ज कोठे सादर करावा?	मंडळाच्या संकेतस्थळावर Online पद्धतीने अर्ज करावा (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	२१ दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , (राज्य मंडळ) पुणे ४११००४

नागरी सनद ०३	**माध्यमिक शाळांतील अतिरिक्त माध्यमांना मान्यता देणेबाबत.**
१) सेवेचे नाव	माध्यमिक शाळांना अतिरिक्त माध्यम सुरू करण्यास मान्यता देणेबाबत.
२) आवश्यकता	एखाद्या माध्यमिक शाळेला ज्या माध्यमास मान्यता मिळाली आहे. त्या शिवाय इतर माध्यम शाळेत सुरू करावयाचे असल्यास मान्यतेची आवश्यकता असते.
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक २८/९ प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित विभागीय मंडळ) (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	१) मंडळ विनियम १९७७ मधील नियम क्रमांक २८(९) मधील नमुना–दोन नुसार विहित नमुन्याप्रमाणे (तीन प्रतीत) २) विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या शिफारशीचे पत्र
६) अर्ज कोठे सादर करावा?	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	६० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा?	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंड, (राज्य मंडळ) पुणे –४११००४

नागरी सनद ०४	उच्च माध्यमिक शाळांतील (कनिष्ठ महाविद्यालय) अतिरिक्त माध्यमांना मान्यता देणेबाबत
१) सेवेचे नाव	उच्च माध्यमिक शाळांतील (कनिष्ठ महाविद्यालय) अतिरिक्त माध्यमांना मान्यता देणेबाबत.
२) आवश्यकता	एखाद्या उच्च माध्यमिक शाळेस ज्या माध्यमास मान्यता मिळाली आहे त्या शिवाय इतर माध्यम सुरू करावयाचे असल्यास मान्यतेची आवश्यकता असते.
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६६ प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा	(संबंधित विभागीय मंडळ) (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	१) मंडळ विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६६ मधील परिशिष्ट दोन प्रमाणे विहित नमुन्याप्रमाणे (तीन प्रतीत) २) संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या शिफारशीचे पत्र.
६) अर्ज कोठे सादर करावा	विभागीय सचिव, (संबंधित विभागीय मंडळ) (पुणे,नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर,कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	६० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा?	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्य मंडळ) पुणे –४११००४

नागरी सनद – ०५	**उच्च माध्यमिक शाळांतील(कनिष्ठ महाविद्यालय) अतिरिक्त विषयांना मान्यता देणेबाबत.**
१) सेवेचे नाव	उच्च माध्यमिक शाळांतील(कनिष्ठ महाविद्यालय) अतिरिक्त विषयांना मान्यता देणेबाबत
२) आवश्यकता	एखाद्या उच्च माध्यमिक शाळेस ज्या विषयास मान्यता मिळाली आहे त्या शिवाय इतर किंवा अतिरिक्त विषय सुरू करावयाचे असल्यास मान्यतेची आवश्यकता असते.
३) कोणत्या कायद्यानुसार / नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६६ मधील परिशिष्ट दोन प्रमाणे विहित नमुन्याप्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा.	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती,नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत.	१) मंडळ विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६६ मधील परिशिष्ट दोनप्रमाणे विहित नमुन्याप्रमाणे तीन प्रतीत २) संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या शिफारशीचे पत्र
६) अर्ज कोठे सादर करावा.	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	६० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्य मंडळ) पुणे -४११००४

नागरी सनद – ०६	**माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांना खाजगीरित्या (Private candidate) प्रविष्ट होण्यासाठी नाव नोंदणी प्रमाणपत्र देणे.**
१) सेवेचे नाव	माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांना खाजगीरीत्या (Private Candidate)प्रविष्ट होण्यासाठी नाव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) देणे .
२) आवश्यकता	माध्यमिक शाळेत / उच्च माध्यमिक विद्यालयात नियमित जाऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना थेट इयत्ता १० वी १२ वीच्या परीक्षेस खाजगीरीत्या (Private Candidate)बसण्याची संधी.
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ४२ (माध्यमिक)/८९ (उच्च माध्यमिक) प्रमाणे (तसेच वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके)
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर ,छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत	१) मान्यताप्राप्त माध्य. शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागामार्फत मंडळाच्या संकेतस्थळावर मंडळाने वेळोवेळी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार फेब्रु –मार्च व जून –जुलै परीक्षासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा.

अ) इ. १० वीसाठी – नावनोंदणी पात्रतेसाठी आवश्यक अटी

परराज्यातील / परदेशातील विद्यार्थी	महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी
१) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यांस खाजगी विद्यार्थी म्हणून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसण्याची विद्यार्थ्यांची इच्छा असेल अशा विद्यार्थ्यांनी त्या परीक्षेच्या प्रारंभाच्या तारखेच्या आधी तो किमान दोन वर्षे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक असेल.	१) विद्यार्थी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेमध्ये किमान ५ वी इयत्ता उत्तीर्ण झालेला असावा व त्याकरिता त्याने आवश्यक तो पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला) सादर करावा.
२) भारताचा नागरिक असलेला एखादा उमेदवार, परदेशातील माध्यमिक शाळेचा नियमित विद्यार्थी असेल आणि त्याने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस समतुल्य म्हणजे (सिनियर केंब्रिज वा तत्सम अन्य) उमेदवार म्हणून परीक्षेस प्रविष्ट होण्यास परवानगीसाठी परीक्षेचा अभ्यासक्रम पूर्ण केला असेल तर त्याला खाजगी नावनोंदणी करता येईल, मात्र अशा उमेदवारास सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेला रहिवासी दाखला सादर करणे बंधनकारक असेल.	२) संबंधित विभागीय मंडळाकडे नाव नोंदविताना विद्यार्थ्याने वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असतील. त्यासाठी जन्मतारखेचा आवश्यक तो पुरावा सादर करावा.
३) परराज्यातील विद्यार्थी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेमध्ये किमान ५ वी इयत्ता उत्तीर्ण झालेला असावा व त्याकरिता त्याने आवश्यक तो पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला) सादर करावा.	३) महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इयत्ता १०वी साठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) म्हणून नावनोंदणी करता येईल.
४) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यांची ज्या वर्षाच्या फेब्रुवारी- मार्च मध्ये घेण्यात येणाऱ्या इ. १० वी परीक्षेस बसण्याची इच्छा असेल तर त्याला त्या शैक्षणिक वर्षात कोणत्याही मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेच्या हजेरीपटावर नियमित विद्यार्थी म्हणून नाव दाखल करता येणार नाही.	
५) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय मंडळाकडे नाव नोंदविताना वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असतील, त्यासाठी जन्मतारखेचा आवश्यक तो पुरावा सादर करील.	
शाळा सोडल्याच्या दाखल्यामधील दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरण्यात यावा.	

ब) इ.१२वी साठी – नावनोंदणी अर्जासोबत (फॉर्म नं. १७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अपलोड (upload) करावयाची कागदपत्रे

१. इ. १० वी ची मूळ गुणपत्रिका.

२. इ. १० वी उत्तीर्णतेचे मूळ प्रमाणपत्र.

३. इ. १०वी/ इ. ११वी शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय/पॉलिटेक्निक कॉलेज सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.), दुय्यम दाखला (Duplicate T.C.) जोडल्यास मागील दोन वर्षांत कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गात नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला नसल्याबाबत कोऱ्या कागदावर साक्षांकित केलेले प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक आहे.

४. इ. ११वी परीक्षेची मूळ गुणपत्रिका.

५. रहिवासी पुरावा रेशनकार्ड/आधार कार्ड/मतदान ओळखपत्र/सक्षम अधिकाऱ्यांचे (विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बदली आदेशाची प्रमाणित छायाप्रत) विहित नोंदणी प्रमाणपत्र.

६. विद्यार्थ्यांचे विहित नमुन्यातील हमीपत्र (प्रपत्र क्रमांक–१)

७. शाळा/कनिष्ठ महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला (Original T.C.) न जोडता दुय्यम दाखला (Duplicate T.C.) जोडल्यास, मूळ दाखला का सादर करू शकत नाही याचे कारण नमूद करून व मागील दोन वर्षांत कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतला नसल्याबाबत रु. १००/– च्या स्टॅम्प पेपरवर कोर्ट फीसह केलेले प्रतिज्ञापत्र (AFFIDAVIT) जोडणे आवश्यक आहे. नमुना सोबत जोडला आहे. (प्रपत्र क्रमांक–२)

८. पूर्वपरवानगीशिवाय खाजगी विद्यार्थ्यांचे ५० पेक्षा जास्त फॉर्म नं. १७ न पाठविण्याबाबतचे हमीपत्र (प्रपत्र अ)

९. भाषा विषय तोंडी परीक्षा, पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम व प्रकल्प, प्रात्यक्षिके पूर्ण करून घेण्याबाबतचे हमीपत्र

१०. खाजगी विद्यार्थ्याने घेतलेल्या विषयात प्रात्यक्षिके असतील तर त्यास ती पूर्ण करण्यासाठी मिळणाऱ्या सुविधेसाठी कनिष्ठ महाविद्यालयाकडे एकत्रित शुल्क रु. १००/– भरावे लागेल.

११ . इ. १२ वीच्या नियमित परीक्षेसाठी कोणताही (फॉर्म नं. १७ सहित) खाजगी विद्यार्थी क्रीडा सवलतीच्या अतिरिक्त गुणांसाठी पात्र राहील. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सदर प्रस्ताव विहित नमुन्यात व विहित मुदतीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतींसह मान्यतेसाठी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यामार्फत मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

६) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	६० दिवस (नाव नोंदणी प्रमाणपत्र (E.C) मिळेल) याबाबत मंडळाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येईल
७) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.	अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, (राज्य मंडळ) पुणे– ४११००४

नागरी सनद – ०७	परीक्षा केंद्र मान्यता
१) सेवेचे नाव	परीक्षा केंद्र मान्यता
२) आवश्यकता	माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षेस केंद्रांना मान्यता देण्यासाठी केंद्रावर प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार तसेच शाळा/महाविद्यालयापासून जास्तीतजास्त जवळ असलेल्या परीक्षा केंद्रांना गरजेनुसार मान्यता दिली जाते.
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ३६ (माध्यमिक) / ८३ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	संस्थाप्रमुखांमार्फत (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	विभागीय मंडळाकडे उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील अर्ज एका प्रतीत विहित प्रपत्रातील माहितीच्या पूर्ततेसह व आवश्यक त्या विहित शुल्कासह (फेब्रुवारी / मार्च परीक्षेसाठी आधीच्या वर्षाच्या ३१ ऑगस्ट पूर्वी (तसेच वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके)
६) अर्ज कोठे सादर करावा?	शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	६० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष,(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – ०८	माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी आवेदनपत्रे सादर
१) सेवेचे नाव	माध्यमिक/उच्च माध्यमिक परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी आवेदनपत्रे सादर करणे.
२) आवश्यकता	परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ४६ (माध्यमिक) / ९३ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा	मुख्याध्यापक, माध्यमिक शाळा/प्राचार्य, उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय
५) अर्ज कसा करावा,	मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा /कनिष्ठ महाविद्यालय विभागामार्फत मंडळाच्या संकेतस्थळावर मंडळाने वेळोवेळी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार फेब्रुवारी –मार्च व जून-जुलै परीक्षांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा .
६) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वी अंदाजे १० दिवस अगोदर शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामार्फत Online प्रवेशपत्र (Hall Ticket) मिळेल.
७) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर , मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक लातूर, कोकण)

नागरी सनद – ०९	उत्तीर्णतेचे तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) देणे
१) सेवेचे नाव	उत्तीर्णतेचे तात्पुरते प्रमाणपत्र (Provisional Certificate) देणे
२) आवश्यकता	पुढील शिक्षणासाठी
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६४ (माध्यमिक) / १११ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा ? अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत ?	मंडळाच्या संकेतस्थळावर online पद्धतीने विभागीय मंडळाकडे अर्ज करावा. आवश्यक त्या माहितीसह (बैठक क्रमांक, वर्ष इत्यादी) आवश्यक त्या शुल्कासह संबंधित शाळेचे पत्र, गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडावी.
६) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	निकालानंतर १५ दिवसांनी
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – १०	**गुणपडताळणी, उत्तरपत्रिका छायाप्रती, पुनर्मूल्यांकन**
१) सेवेचे नाव	गुणपडताळणी करून मिळणे. उत्तरपत्रिका छायाप्रती, पुनर्मूल्यांकन करून मिळणे.
२) आवश्यकता	परीक्षेत मिळालेल्या संपादणुकीचे निरसन करून घेण्यासाठी
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ५७ (माध्यमिक) / १०४ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा? अर्ज किती प्रतीत करावा? अर्जासोबत कोणती कागदपत्र जोडावीत?	मंडळाच्या संकेतस्थळावर Online पद्धतीने अर्ज करावा. अर्जासोबत संबंधित गुणपत्रिकेची साक्षांकित केलेली प्रत (प्रत्येक विषयासाठी विहित केलेल्या गुणपडताळणी शुल्कासह) निकाल जाहीर झाल्याच्या तारखेनंतर १० दिवसांच्या आत (त्या त्या परीक्षेच्या निकालाच्या वेळी जाहीर केलेल्या निर्धारित मुदतीत)
६) अर्ज कोठे सादर करावा?	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	निकालानंतर अर्ज सादर केल्यापासून ३० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, लातूर, कोकण)

नागरी सनद – ११	प्रमाणपत्राची द्वितीय प्रत
१) सेवेचे नाव	प्रमाणपत्राची द्वितीय प्रत
२) आवश्यकता	मूळ प्रमाणपत्राची प्रत गहाळ झाल्यास अथवा उपलब्ध नसल्यास
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ६१ (माध्यमिक) / १०८ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा.	शाळा प्रमुखांच्या शिफारशीने (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा? अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	आवश्यक ती माहिती (बैठक क्रमांक, परीक्षेचे वर्ष, शाळा/उच्च माध्यमिक विद्यालय इत्यादी) नमूद करणे आवश्यक मंडळाच्या संकेतस्थळावर Online पद्धतीने विभागीय मंडळाकडे अर्ज करावा.
६) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	३ ते ७ दिवस (संबंधित संस्थेमार्फत प्राप्त करून घ्यावे)
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष,(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद १२	गुणपत्रिकेची द्वितीय प्रत
१) सेवेचे नाव	गुणपत्रिकेची द्वितीय प्रत मिळणे
२) आवश्यकता	मूळ गुणपत्रिकेची प्रत गहाळ झाल्यास अथवा उपलब्ध होत नसल्यास
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते?	मंडळे अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ५६ (माध्यमिक) / १०३ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा.	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर,छत्रपती संभाजीनगर , मुंबई, कोल्हापूर, अमरावती, लातूर,कोकण)
५) अर्ज कसा करावा ? अर्जासोबत कोणती कागदपत्र जोडावीत?	आवश्यक ती माहिती (बैठक क्रमांक, परीक्षेचे वर्ष, शाळा/उच्च माध्यमिक विद्यालय इत्यादी) नमूद करणे आवश्यक मंडळाच्या संकेतस्थळावर Online पद्धतीने विभागीय मंडळाकडे अर्ज करावा. (शुल्कासाठी परिशिष्ट 'अ' पहावे.)
६) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा.	आवश्यक त्या विहित शुल्कासह (शुल्कासाठी परिशिष्ट 'अ' पहावे) विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर , मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	३ ते ७ दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर , मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक लातूर, कोकण)

नागरी सनद – १३	गुणपत्रिकेतील/ प्रमाणपत्रातील / नोंदी दुरुस्त करणे (नाव, जन्मतारीख इत्यादी)
१) सेवेचे नाव	गुणपत्रिकेतील/ प्रमाणपत्रातील / नोंदी दुरुस्त करणे (नाव, जन्मतारीख इत्यादी)
२) आवश्यकता	मूळ गुणपत्रक/ प्रमाणपत्रातील नोंदींमध्ये त्रुटी आढळल्यास.
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ५९ (माध्यमिक) / १०६ (उच्च माध्यमिक) प्रमाणे (तसेच मंडळाकडून वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके)
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा	शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांच्या मार्फत (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर,छत्रपती संभाजीनगर , मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा? अर्ज किती प्रतीत करावा अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	आवश्यक त्या माहितीसह (बैठक क्रमांक, परीक्षा वर्ष, शाळा /उच्च माध्यमिक विद्यालय इत्यादी) व सबळ पुरावे असलेल्या कागदपत्रासह विद्यार्थ्यांचा मूळ दाखला, जनरल रजिस्टर नोंदवही इत्यादी. (दोन प्रतीत)
६) अर्ज कोठे सादर करावा?	शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांच्या मार्फत (संबंधित) विभागीय मंडळ, (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी	१५ दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर,छत्रपती संभाजीनगर , मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
याबाबतची इतर तपशीलवार माहिती संबंधित विभागीय मंडळाकडे उपलब्ध होईल .	

नागरी सनद – १४	परीक्षेसाठी केंद्रबदल / विभागबदल
१) सेवेचे नाव	परीक्षेसाठी केंद्र बदल /विभाग बदल
२) आवश्यकता	मंडळ नियमानुसार मिळालेले परीक्षा केंद्र /विभाग गैरसोयीचे असल्यास
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ३६ (माध्यमिक) / ८३ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत,(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्र जोडावीत?	एका प्रतीत संबंधित संस्थेमार्फत विभागीय सचिवांकडे अर्ज करावा. ज्या कारणास्तव केंद्रबदल/विभागबदल हवा आहे त्यासंबंधीचा लेखी सबळ पुरावा दाखवणारी कागदपत्रे पालकांची बदली झाली असल्यास बदली आदेश व बदलीच्या ठिकाणी रहात असल्याचा पुरावा.
६) अर्ज कोठे सादर करावा?	शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	३० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – १५	दिव्यांग विद्यार्थ्यांना असलेल्या गुणांमधील व इतर सवलती
१) सेवेचे नाव	दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या गुणांमधील व इतर सवलती
२) आवश्यकता	विद्यार्थी दिव्यांग असल्यामुळे
३) कोणत्या कायद्यानुसार / नियमानुसार कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्र. ५२ (माध्यमिक)/ ९९ (उच्च माध्यमिक) प्रमाणे तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण -२०१७/(११८/१७) एस.डी-६, दिनांक : १६ ऑक्टोबर, २०१८ नुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना सोयी व सवलती देण्यात येतात.
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा?	शाळा प्रमुखांमार्फत (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, लातूर , कोकण)
५) अर्ज कसा करावा? अर्ज किती प्रतीत करावा ? अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत ?	एका प्रतीत करावा अर्जासोबत शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र / UDID Card आवश्यक.
६) अर्ज कोठे सादर करावा ?	शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत विभागीय सचिव (सबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	३० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (सबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – १६	**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत**
१) सेवेचे नाव	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत
२) आवश्यकता	विद्यार्थ्यांचे विशेष नैपुण्य व अभ्यासासाठी मिळणारा कमी कालावधी विचारात घेऊन
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ५२ (माध्यमिक) / ९९ (उच्च माध्यमिक) प्रमाणे तसेच महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२ / एस.डी.२ मंत्रालय विस्तार इमारत, मुंबई - ४०० ०३२ दिनांक :- २० डिसेंबर, २०१८ नुसार व महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन शुध्दिपत्रक क्रमांक :- उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२ / एस.डी.२ मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई - ४०० ०३२ दिनांक :- २५ जानेवारी, २०१९ नुसार
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्र जोडावीत ?	संबधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे मार्फत मंडळाने दिलेल्या विहित मुदतीत Online पद्धतीने
६) अर्ज कोठे सादर करावा ?	सबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	शासन निर्णय व मंडळाने वेळोवेळी दिलेल्या मुदतीत.
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष,(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – १७	आजारपणामुळे परीक्षेस प्रविष्ट न झाल्यास परीक्षा शुल्क परत मिळविणे
१) सेवेचे नाव	परीक्षा शुल्क परतावा
२) आवश्यकता	विद्यार्थ्याचा आकस्मिक मृत्यू झाल्यास या कारणास्तव परीक्षा शुल्क परत मिळते.
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ४८ (माध्यमिक) / ९५ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत ?	शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत सबंधित विभागीय मंडळाकडे
६) अर्ज कोठे सादर करावा ?	शाळा/कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांमार्फत विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	३० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – १८	माध्यमिक/ उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अतिरिक्त स्वतंत्र विषय घेऊन परीक्षेस बसणे
१) सेवेचे नाव	माध्यमिक / उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर अतिरिक्त स्वतंत्र विषय घेऊन परीक्षेस बसणे
२) आवश्यकता	विद्यार्थ्याने एकदा माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर त्यास पुन्हा त्याच विषयांच्या परीक्षेस बसता येत नाही परंतु त्याव्यतिरिक्त अन्य विषयांच्या परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ४५ (माध्यमिक) / ९२ (उच्च माध्यमिक) प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत ?	एका प्रतीत. संबंधित परीक्षेचे आवेदनपत्र भरून संबंधित परीक्षा उत्तीर्णतेची गुणपत्रिका / प्रमाणपत्र
६) अर्ज कोठे सादर करावा ?	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	परीक्षा सुरू होण्यापूर्वी १० दिवसात ऑनलाईन/ ऑफलाईन 'प्रवेशपत्र' मिळेल.
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रारनिवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – १९	प्रमाणपत्र/ गुणपत्रिका पडताळणी
१) सेवेचे नाव	प्रमाणपत्र/ गुणपत्रिका पडताळणी
२) आवश्यकता	नोकरी देताना/उच्च शिक्षणास प्रवेश देताना / आवश्यकतेनुसार माध्यमिक/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेच्या संपादणुकीची खात्री करून घेणे.
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील तरतुदीनुसार
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत?	मंडळाच्या संकेतस्थळावर Online पद्धतीने विभागीय मंडळाकडे अर्ज करावा. आवश्यक त्या माहितीसह (बैठक क्रमांक, वर्ष इत्यादी) आवश्यक त्या शुल्कासह संबंधित शाळेचे पत्र, प्रमाणपत्र/ गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडावी. तसेच फेब्रुवारी–मार्च १९९० आणि त्यानंतर झालेल्या इयत्ता १०वी आणि १२ वीच्या गुणपत्रकांची आणि उत्तीर्ण प्रमाणपत्रांची ऑनलाईन पडताळणी मंडळाच्या www.mahahsscboard.in संकेतस्थळावर करता येईल.
६) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	३० दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – २०	शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्रावीण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यपद्धती
१) सेवेचे नाव	शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्रावीण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यपद्धती
२) आवश्यकता	विद्यार्थ्यांचे विशेष नैपुण्य व अभ्यासासाठी मिळणारा कमी कालावधी विचारात घेऊन
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण २०१६ / प्र.क्र. २०२ / एसडी-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२. दिनांक: २४ नोव्हेंबर, २०१७
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा ? अर्ज किती प्रतीत करावा ? अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत ?	मंडळाने दिलेल्या विहित मुदतीत Online पद्धतीने
६) अर्ज कोठे सादर करावा ?	संबंधित विभागीय सचिव, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	शासन निर्णय व मंडळाने वेळोवेळी दिलेल्या मुदतीत.
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय अध्यक्ष, (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

गणकयंत्र विभाग

नागरी सनद – २१	माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांशी संबंधित सांख्यिकीय माहिती
१) सेवेचे नाव:	माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांशी संबंधित सांख्यिकीय माहिती.
२) आवश्यकता:	विविध संशोधन प्रकल्पांसाठी तसेच झालेल्या प्रगतीचा मागोवा घेण्याच्या दृष्टीने शैक्षणिक व स्वयंसेवी संस्था/पालक यांना या माहितीची गरज पडते.
३) कोणत्या कायद्यानुसार / नियमानुसार शासन कार्यवाही केली जाते	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ५५/१०२ प्रमाणे .
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	१) (त्या त्या विभागीय मंडळाच्या माहितीसाठी) :- (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण) (२) संपूर्ण राज्याच्या एकत्रित माहितीसाठी :- राज्य मंडळ, पुणे.
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा, अर्जासोबत ोणती कागदपत्रे जोडावीत ?	मागील ५ वर्षाची इ.१० वी/ १२ वी निकालाची सांख्यिकीय माहिती मंडळाच्या Website www.mahahsscboard.in वर Statistic या विभागात उपलब्ध आहे, यापूर्वीची माहिती हवी असल्यास वर्षाची सांख्यिकीय माहिती व कोणत्या कामासाठी हवी आहे, याचा तपशील असणारा साध्या कागदावर अर्ज. एका प्रतीत.
६) अर्ज कोठे सादर करावा?	(१) (संबंधित) विभागीय मंडळ (त्या त्या विभागीय मंडळाची माहिती) (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर , मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण) (२) राज्य मंडळ, पुणे : संपूर्ण राज्याच्या एकत्रित माहितीसाठी
७) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	(१) ५ वर्षांमधील माहिती हवी असल्यास ०७ दिवस (२) ५ वर्षांपूर्वीची माहिती हवी असल्यास १५ दिवस
८) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळ (राज्य मंडळ) पुणे – ४११००४

नागरी सनद – २२	मंडळ प्रकाशने उपलब्धता
१) सेवेचे नाव :	मंडळ प्रकाशने उपलब्धता.
२) आवश्यकता	मंडळातर्फे 'शिक्षण संक्रमण हे मासिक दरमहा प्रकाशित करण्यात येते. शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना Digital पद्धतीने उपलब्ध करण्यात आले आहे.
३) कोणत्या कायद्यानुसार/ नियमानुसार	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील तरतुदीनुसार केली जाते
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	'शिक्षण संक्रमण' मासिकासाठी सचिव, राज्य मंडळ, पुणे ४
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा.	सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना सदर शिक्षण संक्रमण अंक Digital स्वरुपात मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर व शाळांच्या लॉगीनवर विनामूल्य उपलब्ध आहे.
६) अर्जासोबत कोणती कागदपत्र जोडावीत ?	निरंक
७) अर्ज कोठे सादर करावा ?	------
८) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	------
९) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास	------
१०) तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	------

नागरी सनद – २३	उच्च माध्यमिक परीक्षांसाठी समकक्षता / योग्यता प्रमाणपत्र (इयत्ता ११ वी)
१) सेवेचे नाव	उच्च माध्यमिक परीक्षांसाठी समकक्षता / योग्यता प्रमाणपत्र (इयत्ता ११ वी)
२) आवश्यकता	महाराष्ट्र राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळे, मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठे यांच्या अधिकृत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या परंतु मंडळाच्या उच्च माध्यमिक शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना आवश्यकता असते.
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते ?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ८० प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा,	१) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने CBSE आणि ICSE च्या विद्यार्थ्यांच्या नावांची यादी व शुल्क विभागीय मंडळांकडे थेट जमा करावे. २) CBSE व ICSE व्यतिरिक्त इतर मंडळाच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विहित शुल्कासह दिनांक ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करावा.
६) अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत ?	अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे जोडावयाची आहेत. १) १० वीच्या उत्तीर्णता गुणपत्रिकेची प्रमाणित छायांकित प्रत २) १० वीच्या उत्तीर्णता प्रमाणपत्राची प्रमाणित छायांकित प्रत ३) शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित छायांकित प्रत ४) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) ५) विद्यार्थ्याने परदेशातील परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास अर्जासोबतचे परिशिष्ट 'A' ६) अर्जासोबत जोडलेले विहित नमुन्यातील हमीपत्र इत्यादी.
७) अर्ज कोठे सादर करावा ?	मंडळाचे अधिकृत संकेतस्थळावर www.mahahsscboard.in
८) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	३० दिवस
९) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय सचिव , (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

नागरी सनद – २४	उच्च माध्यमिक परीक्षांसाठी समकक्षता / योग्यता प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी)
१) सेवेचे नाव	उच्च माध्यमिक परीक्षांसाठी समकक्षता / योग्यता प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी)
२) आवश्यकता	महाराष्ट्र राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळे, मान्यताप्राप्त संस्था व विद्यापीठे यांच्या अधिकृत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या परंतु मंडळाच्या उच्च माध्यमिक शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना आवश्यकता असते.
३) कोणत्या कायद्यानुसार/नियमानुसार शासन नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते?	मंडळ अधिनियम १९६५ नुसार विनियम १९७७ मधील नियम क्रमांक ८० प्रमाणे
४) कोणत्या कार्यालयाशी संपर्क साधावा ?	(संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)
५) अर्ज कसा करावा, अर्ज किती प्रतीत करावा,	१) उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाने CBSE आणि ICSE च्या विद्यार्थ्यांच्या नावांची यादी व शुल्क विभागीय मंडळांकडे थेट जमा करावे. २) CBSE व ICSE व्यतिरिक्त इतर मंडळाच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने विहित शुल्कासह दिनांक ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करावा.
६) अर्जासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत ?	अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे जोडावयाची आहेत. १) १० वीच्या उत्तीर्णता गुणपत्रिकेची प्रमाणित छायांकित प्रत २) १० वीच्या उत्तीर्णता प्रमाणपत्राची प्रमाणित छायांकित प्रत ३) शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रमाणित छायांकित प्रत ४) मूळ स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) ५) विद्यार्थ्याने परदेशातील परीक्षा उत्तीर्ण केली असल्यास अर्जासोबतचे परिशिष्ट 'A' ६) अर्जासोबत जोडलेले विहित नमुन्यातील हमीपत्र इत्यादी.
७) अर्ज कोठे सादर करावा?	मंडळाचे अधिकृत संकेतस्थळावर www.mahahsscboard.in
८) अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी ?	३० दिवस
९) विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा ?	विभागीय सचिव , (संबंधित) विभागीय मंडळ (पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोकण)

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे मार्फत
नागरिकांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या ऑनलाईन सेवा

अ.क्र.	कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरवली जाईल ?	सेवा पुरविणारा अधिकारी	सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल. ते अधिकारी व कार्यालय
१	२	३	४	५
०१	माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा द्वितीय गुणपत्रिका	तात्काळसाठी ३ दिवस व नियमितसाठी ७ दिवस	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०२	माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा तात्पुरते (Provisional) प्रमाणपत्र	निकालानंतर अर्ज सादर केल्यापासून ८ दिवस	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०३	माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा गुणपडताळणी	निकालानंतर अर्ज सादर केल्यापासून १५ दिवस	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०४	माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा निकालानंतर उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत प्राप्त करणे	निकालानंतर अर्ज सादर केल्यापासून ३० दिवस किवा तत्पूर्वी	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०५	खाजगी उमेदवार परीक्षेस प्रविष्ट होणे	मंडळाच्या वार्षिक वेळापत्रकाप्रमाणे	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे मार्फत नागरिकांना या कार्यालयाकडून पुरविण्यात येणाऱ्या ऑफलाईन सेवा

अ. क्र.	कार्यालयाकडून पुरवली जाणारी सेवा	आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरवली जाईल ?	सेवा पुरविणारा अधिकारी	सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्याच्याकडे तक्रार करता येईल. ते अधिकारी व कार्यालय
१	२	३	४	५
०१	योग्यता प्रमाणपत्र देणे / निर्णय देणे	६० दिवस	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०२	समकक्षता प्रस्ताव विभागीय मंडळाकडून राज्य मंडळाकडे सादर करणे	२१ दिवस	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०३	समकक्षता प्रस्तावाबाबत राज्य मंडळ स्तरावरून निर्णय देणे.		संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०४	माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा गुणपत्रक व प्रमाणपत्र इ. मधील नाव / जन्मदिनांक / जन्म ठिकाण वर्णलेखातील दुरुस्ती / तत्सम दुरुस्ती प्रस्तावावर मंडळाकडून कार्यवाही करून निर्णय देणे. (माध्यमिक शाळा / क.म.वि.)	१५ दिवस	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष
०५	खाजगी उच्च माध्यमिक शाळांमधील अध्यापक / विद्यालयातील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांचे नाव शालार्थ प्रणालीत समाविष्ट करणेबाबत	२१ दिवस	संबंधित विभागीय अध्यक्ष	शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, पुणे
०६	मंडळ मान्यता देणे व सांकेतिक क्रमांक देणे.	२१ दिवस	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय सचिव	संबंधित विभागीय मंडळाचे विभागीय अध्यक्ष

आस्थापना विभाग

मंडळातील गट "अ" ते गट "ड" मधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	विभाग	विभाग प्रमुख / उपविभाग प्रमुख	गट क लिपिक संवर्गातील कर्मचारी	विभागाकडून करण्यात येणारी कामे
०१.	आस्थापना	विभाग प्रमुख श्री प्रभाकर अरविंद कुलकर्णी, वरिष्ठ अधीक्षक, अति. कार्यभार उपविभाग प्रमुख श्रीम. सुप्रिया नरेंद्र काळगी, पर्यवेक्षक लिपिक		१) आस्थापना शाखेतील कर्मचाऱ्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे व कामकाजाचे नियोजन करणे इत्यादी बाबतीत शाखाधिकाऱ्यांना मदत करणे. २) शाखेतील लिपिकांच्या प्रकरणिका तपासून अभिप्रायासह शाखाधिका- यांकडे सादर करणे. ३) संबंधितांच्या प्रकरणिकेवरील आदेशानुसार प्रकरणिकांवरील कार्यवाहीचा आढावा घेऊन शाखाधिकारी यांना अवगत करणे. ४) माहिती अधिकार प्रकरणात आवश्यकतेनुसार कार्यवाही करणे. ५) राज्यमंडळातील सर्व शाखांचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करण्याबाबत शाखाधिकारी आस्थापना यांना सहकार्य करणे. ६) आस्थापना विषयक तातडीच्या प्रकरणांबाबत सर्व विभागीय मंडळातील सद्य:स्थितीचा आढावा घेण्याकामी शाखाधिकारी, आस्थापना यांना सहकार्य करणे. ७) शासन, सर्व संघटना व मंडळ प्रशासन यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी शाखाधिकारी, आस्थापना यांना सहकार्य करणे. ८) सर्व उपस्थितीपट, रजा व कर्मचारी उपस्थिती / अनुपस्थिती यावर नियंत्रण ठेऊन नोंदी विहित पद्धतीने व योग्यवेळी होण्यासाठी शाखाधिकारी, आस्थापना यांना सहकार्य करणे. ९) मंडळ अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या विभागीय चौकशी संदर्भातील सर्व कामे करणे (ज्ञापन, दोषारोप पत्र, चौकशी व सादरकर्ता अधिकारी नियुक्ती, प्रत्यक्ष चौकशी प्रकिया, इतिवृत्त, अंतिम चौकशी अहवाल, त्यावरील अंतिम निर्णय व त्याअनुषंगिक कार्यवाही.) १०) मा. वरिष्ठांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे/सूचनांचे यथानियम पालन करणे.
			कार्यासन क्र.०४ श्री. प.वि. शेप कनिष्ठ लिपिक	१) निवड समितीचे आयोजनापासून पुढील सर्व कार्यवाही करणे. २) दरमहा सेवाज्येष्ठता यादी व रिक्त पदांची माहिती अद्ययावत करणे. दरवर्षी अद्ययावत सेवाज्येष्ठता यादी तयार करणे. ३) सर्व संवर्गातील मंडळ कर्मचाऱ्यांचे बढती- प्रस्ताव निवड समितीसमोर ठेवणे. ४) मंडळ आस्थापनेवरील सरळसेवा/पदोन्नती रोस्टर रजिस्टर, बिंदु नामावली तयार करणेव ती मागासवर्गीय कक्ष, पुणे यांचेकडून तपासून घेऊन नोंदी करणे. ५) सर्व कर्मचाऱ्यांच्या नियतकालिक बदल्या/ प्रस्ताव प्रकरणे सादर करून आदेशानुसार कार्यवाही करणे. ६) राज्य मंडळ कार्यालयातून बदली झालेल्या कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्याबाबतच्या प्रकरणिकेवरील कार्यवाही करणे. ७) मंडळ कर्मचारी सर्व संघटना संदर्भातील कामे. ८) याशिवाय वरिष्ठांच्या आदेशानुसार अन्य कामे करणे .

			कार्यासन क्र. ६ श्रीम. अ. अ. कुलकर्णी, वरिष्ठ लिपीक	१) विभागीय मंडळातील कर्मचाऱ्यांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे सादर करणे तसेच संबंधितांच्या अर्जित रजा रोखीकरण इत्यादी बाबतच्या प्रकरणिकेवरील कार्यवाही करणे. २) राज्य मंडळातील व सर्व विभागीय मंडळ अधिकारी स्वेच्छा सेवानिवृत्ती / राजीनामे / निधन प्रस्ताव इत्यादी प्रकरणिकांबाबत कार्यवाही करणे. ३) राज्य मंडळ कार्यालयात बदलीने येणाऱ्या व नवनियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांची पदस्थापनेबाबतची कार्यवाही करणे. ४) राज्यमंडळ व सर्व विभागीय मंडळ अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाचे संकलन करणे व निवड समितीच्या सभेसाठी गोपनीय अहवालाचे सादरीकरण करणे. ५) राज्यमंडळ नवनियुक्त कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक व जात प्रमाणपत्र पडताळणीबाबतची कार्यवाही करणे. ६) शाखांतर्गत कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत प्रस्ताव सादर करणे. ७) राज्यमंडळ कार्यालयातील कर्मचाऱ्यांची वेतन निश्चितीबाबतची कामे. ८) कर्मचाऱ्यांसाठी आदेश / सूचनाबाबत परिपत्रके काढणे. ९) सर्व विभागीय मंडळाकडून प्राप्त कर्मचाऱ्यांशी निगडित प्रकरणी कार्यवाही करणे. १०) कर्मचाऱ्यांचे कर्मचाऱ्यांविषयी प्राप्त तक्रार अर्जाबाबत कार्यवाही करणे. ११) याशिवाय मा. वरिष्ठांच्या आदेशानुसार अन्य कामे करणे.
			कार्यासन क्र. ७ श्री. अ.रा. चोथे वरिष्ठ लिपिक	१) माहिती अधिकार सदरातील सर्व प्रस्तावांवर संबंधितांकडून माहिती मागवून कार्यवाही करणे. तसेच जनमाहिती अधिकारी, सहायक जनमाहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांची यादी मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे. २) सर्व शाखा व सर्व विभागीय मंडळाकडून माहिती अधिकार प्रस्तावाची माहिती मागवून संकलित करणे व याबाबतचा दरमहा अहवाल मा. आयुक्त कार्यालय, शासनास व जिल्हाधिकारी कार्यालय यांना पाठवणे. तसेच, वार्षिक अहवालाबाबतची कार्यवाही करणे. ३) माहिती अधिकार कलम ४ ची माहिती अद्ययावत करणे, प्रलंबित अहवाल, साप्ताहिक अहवाल इत्यादी माहिती मा.आयुक्त कार्यालयास सादर करणे. ४) सेवा हमी कायद्यांतर्गत आलेली पत्रे, मासिक अहवाल सबंधित विभागांना सादर करणे ५) विधानसभा/विधानपरिषद तारांकित/अतारांकित प्रश्नांबाबतचे शाखां कडून प्राप्त झालेली उत्तरे/पत्रांच्या प्रती संकलित करणे वा नोंदवह्या अद्ययावत ठेवणे. ६) हिवाळी/पावसाळी व अर्थसंकल्पीय अधिवेशन तसेच फेब्रुवारी-मार्च व जून-जुलै परीक्षा नियंत्रण कक्ष, राज्यमंडळ अधिकारी/कर्मचारी घोषणापत्रे घेणे इत्यादी ७) मंडळ अधिकारी/कर्मचारी यांना पारपत्रासाठी ना-हरकत प्रमाणपत्रे देणे इतर विविध परीक्षांना बसण्यास परवानगी देणे यांबाबतचे प्रस्ताव सादर करून कार्यवाही करणे. ८) याशिवाय मा. वरिष्ठांच्या आदेशानुसार अन्य कामे करणे.

			कार्यासन क्र. ८ तसेच मा. अध्यक्ष यांचे अस्वीस पदाचा कार्यभार श्री. र.ज. शिंदे, वरिष्ठ लिपिक	१) सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाबाबत कार्यवाही करणे. २) सुरक्षारक्षक यांचे देयक अदा करणे, संबंधित पत्रव्यवहार पाहणे ३) आवश्यकतेनुसार इतर गोपनीय कामे याशिवाय मा. वरिष्ठांच्या आदेशानुसार अन्य कामे करणे.
			कार्यासन क ९ श्रीम. मा. श्री. पाटील, कनिष्ठ लिपिक	१) राज्य मंडळातील कर्मचाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकातील रजेबाबतच्या व इतर अनुषंगिक नोंदी अद्ययावत करणे. २) राज्य मंडळ कार्यालयातील सर्व मंडळ कर्मचाऱ्यांच्या नैमित्तिक / अर्जित/परिवर्तीत इतर सर्व प्रकारच्या रजांबाबत कार्यवाही करणे. ३) मंडळ कर्मचारी जादा काम भत्ता व मंडळ अधिकारी कर्मचारी यांच्या सुट्टीच्या कामाच्या दिवसांच्या नोंदी ठेवणे. ४) बदलीद्वारे रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बदली प्रवास भत्ता देयकांबाबत कार्यवाही करणे. ५) राष्ट्रीय सण, राष्ट्रपुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करण्याबाबत कार्यवाही करणे. ६) ऑनलाईन शाखेतील समन्वयक मानधनाबाबतची कार्यवाही करणे. ७) शाखेतील स्थळप्रती वाटप करणे व कर्मचारीनिहाय नोंदी ठेवणे. ८) शाखेसाठी लेखनसाहित्याची भांडार शाखेकडून मागणी करणे ९) कर्मचाऱ्यांशी निगडित असलेले आदेश/ शासन निर्णय /परिपत्रके इत्यादी बाबतची कार्यवाही करणे. १०) आस्थापना शाखेशी निगडित असलेल्या लेखाशीर्षांचे मूळ अंदाजपत्रक, आठमाही सुधारित अंदाजपत्रक व वार्षिक हिशोब इत्यादी बाबत कार्यवाही करणे. ११) बायोमेट्रीक प्रणाली संदर्भातील प्रकरणिकांबाबत कार्यवाही. १२) राज्य मंडळातील सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीचे निरोप समारंभ आयोजनाबाबतची कार्यवाही करणे १३) रा.मं. कर्मचाऱ्यांच्या वार्षिक वेतनवाढी संदर्भातील कार्यवाही करणे. १४) कर्मचाऱ्यांच्या ५ टक्के विशेष वेतन मंजूर करण्याबाबतच्या प्रकरणिका
		उपविभाग प्रमुख श्रीमती निता ववले, पर्यवेक्षक लिपिक		१) आस्थापना शाखेतील कर्मचाऱ्यांच्या कामावर नियंत्रण ठेवणे व कामकाजाचे नियोजन करणे इ. बाबतीत शाखाधिकाऱ्यांना मदत करणे. २) शाखेतील लिपिकांच्या प्रकरणिका तपासून अभिप्रायासह शाखाधिकाऱ्यांकडे सादर करणे. ३) संबंधितांच्या प्रकरणिकेवरील आदेशानुसार प्रकरणिकांवरील कार्यवाहीचा आढावा घेऊन शाखाधिकारी यांना अवगत करणे. ४) माहिती अधिकार प्रकरणात आवश्यकतेनुसार सहकार्य करणे. ५) राज्यमंडळातील सर्व शाखांचे सर्वसाधारण पर्यवेक्षण करण्याकामी शाखाधिकारी आस्थापना यांना सहकार्य करणे. ६) आस्थापनाविषयक तातडीच्या प्रकरणांबाबत सर्व विभागीय मंडळातील सद्यःस्थितीचा आढावा घेण्यासाठी शाखाधिकारी, आस्थापना यांना सहकार्य करणे.

			कार्यासन क्र. ५ तसेच मा. सचिव यांचे सस्वीस पदाचा कार्यभार श्री.शे. मा. कोकाटे, वरिष्ठ लिपिक	१) ठेकेदारी पद्धतीने नियुक्त करावयाच्या कुशल/अकुशल कर्मचाऱ्यांसाठी निविदा प्रक्रियाबाबतची सर्व कामे करणे. २) न्यायालयीन प्रकरणांसंदर्भातील कामे. ३) कंत्राटी/रोजंदार वाहनचालक जादाकाम भत्ता, कंत्राटी रोजंदारी कर्मचाऱ्यांना मानधन अदा करणेबाबतची कार्यवाही करणे. ४) कार्यालयीन साफसफाई टेंडर व वेतनाबाबत कामे
			कार्यासन क. २ श्री.ह.श्री जानकर, वरिष्ठ लिपिक	१) राजपत्रित अधिकारी यांच्याशी निगडित सर्व कामे २) राज्यमंडळ व संबंधित विभागीय मंडळातील राजपत्रित अधिकारी यांची वेतननिश्चिती व वार्षिक वेतनवाढ मंजुरीबाबतच्या प्रकरणिका सादर करणे. ३) राजपत्रित अधिकारी व लेखाधिकारी यांची रिक्त पदे भरणेबाबतच्या प्रकरणिकेवरील कार्यवाही करणे. रिक्त पदांचा अहवाल दरमहा शासनास सादर करणे. ४) राजपत्रित अधिकारी यांच्या संदर्भातील मा. आयुक्त शिक्षण व शासनाकडून वेळोवेळी मागणी केलेल्या माहितीची पूर्तता करण्याबाबत कार्यवाही करणे. ५) राज्य मंडळ व संबंधित विभागीय मंडळातील राजपत्रित अधिकारी यांच्या सर्व प्रकारच्या रजा व ५ टक्के विशेष वेतन मंजूर करण्याबाबतच्या प्रकरणिका. ६) विभागीय मंडळातील विभागीय अध्यक्ष यांची मूळ सेवापुस्तके जतन करून त्यामध्ये अद्ययावत सर्व नोंदी घेणे. ७) राज्य मंडळातील राजपत्रित अधिकारी व संबंधित विभागीय मंडळातील विभागीय अध्यक्ष यांच्या सेवानिवृत्ती प्रकरणांबाबत सर्व कार्यवाही करणे. ८) संबंधित विभागीय मंडळातील राजपत्रित अधिकारी स्थायी– अस्थायी पदे, जात वैधता प्रकरणे, ना हरकत प्रमाणपत्रे, पत्रव्यवहार, अतिरिक्त कार्यभार विशेष वेतन प्रकरणे यांबाबतचा पत्रव्यवहार करणे. ९) संबंधित मंडळांमधील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या चौकशी प्रकरणांबाबत पत्रव्यवहार करणे. १0) राजपत्रित अधिकारी तसेच त्यांच्या संघटनेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या माहिती अधिकारासंदर्भातील कार्यवाही करणे. ११) महिला तक्रार निवारण समितीच्या सभा आयोजित करणे व त्या अनुषंगाने पत्रव्यवहार करणे. १२) याशिवाय वरिष्ठांच्या आदेशानुसार अन्य कामे करणे.
			कार्यासन क्र.३ श्री. नि. य. गायकवाड, वरिष्ठ लिपिक	१) सरळसेवा भरतीप्रकियेसंदर्भातील पत्रव्यवहार पाहणे. २) सर्व विभागीय मंडळ कर्मचाऱ्यांचा परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही/पत्रव्यवहार करणे. सदर विषय मंडळाच्या सक्षम समिती सभेत घेणे, ३) सर्व मंडळ कर्मचाऱ्यांना सांकेतिक कमांक देणे इत्यादी बाबतची कार्यवाही करणे. ४) सर्व संवर्गातील अनुकंपा तत्त्वावरील नोकरीबाबतची कार्यवाही करणे. ५) सरळसेवा भरती संदर्भातील रिक्त पदांबाबत सर्व विभागीय मंडळांचा आढावा घेऊन त्यानुसार कार्यवाही करणे, ६) राज्य मंडळ कर्मचारी नियुक्ती/सहामाही अहवाल संबंधित कार्यालयांना कळविण्याबाबतची कार्यवाही. याशिवाय मा. वरिष्ठांच्या आदेशानुसार अन्य कामे करणे.

			श्रीम. समीक्षा वि. चकोले, कनिष्ठ लिपिक आस्थापना शाखा– आवक जावक	**आवक** १) सर्व विभागीय मंडळांकडून व इतरांकडून प्राप्त झालेले सर्व टपालाच्या नोंदी यांच्या संगणक प्रणालीमध्ये नोंदविणे. २) पोस्टद्वारे आलेले टपाल संगणक प्रणालीमध्ये नोंदविणे. ३) माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आलेले अर्ज नोंदवहीत नोंदविणे. ४) शासनाकडून प्राप्त झालेले आदेश व पत्रे यांची नोंदवहीत नोंद घेणे. ५) ई–मेलद्वारे प्राप्त झालेली पत्रे नोंदवहीत नोंदविणे व सबंधित शाखेस देणे. ६) शिक्षण आयुक्तालय व तत्काळ कार्यवाहीस्तव प्राप्त झालेली पत्रे नोंदवहीत नोंदविणे. ७) शाखानिहाय टपालांच्या दैनिक नोंदी संबंधित शाखांना टपालासह पाठविणे. ८) आवक विभागात प्राप्त झालेल्या संपूर्ण टपालांच्या महिनानिहाय याद्या जतन करून ठेवणे. **जावक** १) सर्व विभागीय मंडळांना पाठविलेल्या टपालाची नोंद जावक नोंदवहीमध्ये करणे. २) पुणे विभागीय मंडळ यांना पाठविलेल्या टपालाची नोंद जावक हस्तपोहोच टपाल नोंदवहीत करणे ३) बालभारती, सेनापती बापट मार्ग, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, रा.शै.सं. व प्र. परिषद, शिक्षण संचालक कार्यालय, मा शिक्षण आयुक्त, कार्यालय यांना पाठविलेल्या टपालाची नोंद जावक हस्तपोहाच टपाल नोंदवहीत करणे. ४) साधारण व स्पीड पोस्टाने पाठविण्याचे टपाल पोस्ट ऑफीस कार्यालय डेक्कन येथे जमा करणे. ५) पाठविलेल्या टपालांच्या स्थळप्रतींची नोंद नोंदवहीमध्ये करणे. ६) टपाल खर्च पाठविलेल्या नोंदवही फ्रँकिंग खर्च, डॅकेट, पावती फोल्डर सांभाळणे ७) फ्रँकिंग मशीनमध्ये चेक भरण्याबाबत अग्रिम प्रकरणिका सादर करणे. ८) जावक टपाल नोंद रजिस्टर ०९ ते १२ अद्ययावत ठेवणे. ९) स्पीड पोस्ट रजिस्टर एडी पावती फाईल अद्ययावत ठेवणे. १०) संगणक प्रणालीमध्ये जावक टपालाच्या संपूर्ण नोंदी घेणे. ११) जावक विभागातून पाठविलेल्या संपूर्ण टपालाच्या महिनानिहाय याद्या जतन करून ठेवणे.

गणकयंत्र विभाग

अ.क्र	विभाग	विभाग प्रमुख / उपविभाग प्रमुख	गट क लिपिक संवर्गातील कर्मचारी	विभागाकडून करण्यात येणारी कामे
०१.	गणकयंत्र EDP (Electronic Data Processing)	विभाग प्रमुख श्री. हेमंतकुमार राजपूत गणकयंत्र व्यवस्थापक उपविभाग प्रमुख ॲनलिस्ट प्रोग्रामर श्री. महेंद्र देवकर ऑपरेशन इनचार्ज श्री.प्रशांत सोरते ऑपरेशन इनचार्ज श्री.पंकज वानखडे ऑपरेशन इनचार्ज श्री. दत्तप्रसाद कांदळकर		**१) तांत्रिक कामे** अ. माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांशी संबंधित परीक्षापूर्व, परीक्षा कालावधी व परीक्षोत्तर सर्व टप्प्यांवरील डेटा प्रोसेसिंगची कामे करणे. ब. परीक्षेसंदर्भातील डेटा प्रोसेसिंगबाबत सर्व स्तरांवरील नोंदी (Logs / Records) ठेवणे व त्यांचे संधारण करणे. क. परीक्षेसंदर्भातील अहवाल (Reports) तयार करणे, प्रिंट काढणे व तपासणी करणे. **२) ऑनलाईन पोर्टल व प्रणाली व्यवस्थापन** अ. माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेसंदर्भातील ऑनलाईन पोर्टलचे User Acceptance Testing (UAT) करणे. ब. ऑनलाईन पोर्टलवर उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी विभागीय मंडळांशी व संबंधित यंत्रणांशी समन्वय साधणे. क. ई-मार्कशीट व प्रमाणपत्र (Certificate) ऑनलाईन पोर्टलबाबतची प्रशासकीय व तांत्रिक कामे करणे. ड. ई-मार्कशीट, सर्टिफिकेट व ऑनलाईन नोंदींमधील दुरुस्ती (Corrections) करणे. **३) विभागीय मंडळांशी संबंधित संगणकीय कामकाज** अ. पुणे, लातूर व नाशिक विभागीय मंडळांशी संबंधित परीक्षेचे संगणकीय व डेटा प्रोसेसिंग कामकाज करणे. ब. संबंधित विभागीय मंडळांची प्रमाणपत्रे / गुणपत्रिका यांमधील दुरुस्तीबाबतची संगणकीय प्रक्रिया पूर्ण करणे. क. सर्व विभागीय मंडळांशी तांत्रिक बाबींमध्ये समन्वय साधणे. **४) गुणपत्रिका, प्रमाणपत्र व DigiLocker संबंधित कामे** अ. गुणपत्रिका व प्रमाणपत्र पुरवठ्यासंदर्भातील संगणकीय व प्रणालीगत कामकाज करणे. ब. DigiLocker संदर्भातील सर्व प्रकारच्या तांत्रिक अडचणींचे निराकरण करणे. **५) संगणकीकरण व तांत्रिक साहाय्य** अ.लेखा शाखा व विविध शाखांतील कार्यासनांची संगणकीकरणासंदर्भातील तांत्रिक कामे करणे. ब. मंडळातील विविध विभागांना आवश्यक ते तांत्रिक साहाय्य उपलब्ध करून देणे. **६) प्रशासकीय व कायदेशीर स्वरूपाची कामे** अ. माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेसंदर्भातील सर्व प्रशासकीय प्रकरणिका हाताळणे. ब. EDP / ऑनलाईन विभागाशी संबंधित प्रकरणिका सादरीकरण, पत्रव्यवहार व नस्तीबाबतचे कामकाज करणे. क. जनमाहिती अधिकारी (PIO) व सहायक जनमाहिती अधिकारी म्हणून नेमणुकीनुसार कामकाज करणे. **७) संकेतस्थळ व माहिती प्रसिद्धी** अ. मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर परिपत्रके, वेळापत्रक (Timetable), निविदा सूचना (Tender Notices) कार्यालयीन काम काजासंदार्भातील इतर कागदपत्रे इत्यादी अपलोड करणे.

			वरिष्ठ लिपिक, श्री. सुशील कांबळे	**१) पत्रव्यवहार व प्रकरणिका हाताळणी** अ. शासन, मंत्रालये, केंद्र व राज्य शासकीय कार्यालये, विभागीय मंडळे, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, विद्यापीठे, स्वायत्त संस्था, फाउंडेशन, आयोग, पोलीस विभाग इत्यादींकडून प्राप्त होणाऱ्या सर्व पत्रव्यवहाराची नोंद करणे, वर्गीकरण करणे व कार्यवाही करणे. ब. शिष्यवृत्ती, गुणवत्ता पुरस्कार, आर्थिक साहाय्य योजना, सामाजिक न्याय, आदिवासी विकास, अल्पसंख्याक विकास, मागासवर्ग आयोग इत्यादी विभागांशी संबंधित प्रकरणिका तयार करणे व सादर करणे. क. परराज्य व केंद्र शासन कार्यालयांकडून मागवण्यात येणाऱ्या माहितीबाबत मागण्यांबाबत (Inter-State / Central Requests) आवश्यक डेटा संकलित करून उत्तर पाठविणे. **२) माहिती पुरवठा व पडताळणी (Data Supply & Verification)** क. इ. १० वी व १२ वी परीक्षांशी संबंधित विद्यार्थ्यांची माहिती, गुण, टक्केवारी, गुणवत्ता यादी, UID, रँक, प्रवर्गनिहाय माहिती संकलित करणे. ब. विविध यंत्रणा / संस्था / विद्यापीठे / आयोग / पोलीस विभाग यांना Verification साठी माहिती पुरविणे. क. Inspire Scholarship, Central Sector Scholarship, Ambedkar Foundation, Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Quality Award इ. योजनांसाठी Top १%, Merit List व Final Lists तयार करणे व पाठविणे. **३) माहिती अधिकार (RTI) व कायदेशीर प्रकरणे** अ. माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत प्राप्त अर्ज, अपील, पत्रव्यवहार, नोंदवही संधारण व उत्तर सादर करणे. ब. मा. उच्च न्यायालय, PIL, शासन आदेश, तारांकित / अतारांकित प्रश्न यासंदर्भातील आवश्यक माहिती संकलित करून सादर करणे. **४) परीक्षांसंदर्भातील प्रशासकीय कामकाज** अ. SSC / HSC परीक्षेचे आवेदनपत्रे, प्रवेशपत्रे, हॉल तिकीट, काउंटर फॉईल्स, UID, Time Schedule यासंदर्भातील प्रकरणिका हाताळणे. ब. परीक्षेपूर्व व परीक्षोत्तर डेटा, अहवाल, वेळापत्रक, गुणवत्ता यादी इत्यादीबाबतच प्रशासकीय समन्वय व कामकाज. क. परीक्षा निकाल वेबसाईट / मोबाईल / SMS द्वारे प्रसिद्धीसंदर्भातील फाईल्स, करारनामे व पत्रव्यवहार. **५) गुणपत्रिका, प्रमाणपत्र व ई-मार्कशीट** अ. गुणपत्रिका व प्रमाणपत्र छपाई, पुनर्मुद्रण (Re-print), दुरुस्ती, अप्राप्त प्रकरणे याबाबतची नस्ती कार्यवाही. ब. DigiLocker / NAD / E-Marksheet प्रणाली संदर्भातील प्रशासकीय व समन्वय कामकाज. **६) तांत्रिक व IT-समन्वयाशी संबंधित लिपिकीय कामे** अ. LAN System, Website, Mobile App, Hosting, AMC, UPS, Generator, AC, Hardware-Software खरेदी व देखभाल यासंदर्भातील प्रकरणिका, देयके व अहवाल. ब. NIC, CDAC, CMS, KPMG, Datamation, Secure Print Agencies, Software Vendors यांच्याशी पत्रव्यवहार व समन्वय. **७) संकेतस्थळ, डिजिटल माध्यमे व प्रसिद्धी** अ. मंडळाच्या संकेतस्थळावर परिपत्रके, वेळापत्रके, निकाल, निविदा, माहिती प्रसिद्धी करिता संबंधित शाखांकडून माहिती संकलन. ब. Social Media, Chatbot, Mobile App द्वारे माहिती प्रसिद्धी संदर्भातील फाईल्स. **८) नस्ती व्यवस्थापन व अभिलेख संधारण** अ. Charge File अंतर्गत विविध Folder-wise नस्तींचे वर्गीकरण, संधारण, पल्पिंग, Disposal बाबत कार्यवाही. ब. जुने अभिलेख, काउंटर फाईल्स, कालबाह्य यंत्रसामग्री निर्लेखन (Condemnation) बाबतची नस्ती

सभा विभाग

अ.क्र	विभाग	विभाग प्रमुख उपविभाग प्रमुख	गट क लिपिक संवर्गातील कर्मचारी	विभागाकडून करण्यात येणारी कामे
०१	सभा	विभाग प्रमुख श्री प्रभाकर अरविंद कुलकर्णी, वरिष्ठ अधीक्षक, (अति. कार्यभार) उपविभाग प्रमुख श्रीमती नीता ववले		१) सहविचार/वित्त/परीक्षा/कार्यकारी परिषद/राज्य मंडळ इत्यादी सभांची तारीख निश्चित होताच त्याच दिवशी मा. सदस्यांना नोटीस, शाखांना सभेविषयी कळविणे तसेच याबाबतच्या प्रकरणिका सादर करणे. २) शाखांकडून प्राप्त विषय नियोजित सभेत विषयपत्रिका तयार करून सादर करणे. प्रकरणिका प्राप्त होताच मा. सदस्यांना नोटीस व शाखांना सभेविषयी कळवून शाखांकडून सभेपूर्वी विषय प्राप्त करून घेणे. ३) शाखांकडून प्राप्त विषय नियोजित सभेत विषयपत्रिका तयार करून सादर करणे. ४) सभेसाठी चहापान व अल्पोपाहारासंदर्भातील कार्यवाही करणे, अग्रिमाबाबत प्रकरणिका सादर करणे. मा. सदस्यांचे प्रवास भत्ते देयके प्रमाणित करणे इत्यादी ५) सभेच्या तारखेनंतर पुढील ०८ दिवसात कच्चे ठराव शाखांना देणे. ६) सभेप्रीत्यर्थ झालेल्या अल्पोपाहार व चहापान इत्यादींच्या खर्चाबाबत प्रकरणिका सादर करणे. प्रकरणिका मान्य होताच खर्चाचे मूळ देयक लेखा शाखेकडे पाठविणे. ७) शाखांकडून पुढील ०८ दिवसांत प्राप्त ठरावातील दुरुस्त्यांनुसार इतिवृत्त मसुदा प्रकरणिका सादर करणे. ८) प्रकरणिका प्राप्त होताच इतिवृत्त मा. सदस्यांना तसेच शाखांना पाठविणे शाखांना कार्यवाही अहवाल देणे व १५ दिवसांत कार्यवाही अहवाल प्राप्त करून प्रकरणिका सादर करणे. ९) मंजूर कार्यवाही अहवाल टंकलिखित करून प्रत प्रकरणिकेत चिकटविणे. १०) पुढील सभेत इतिवृत्त कायम केल्यानंतर ते चिकटबुकात चिकटविणे. ११) लेखा शाखेने परिपत्रक काढल्यानंतर विहित कालावधीत वार्षिक हिशोब, आठमाही सुधारित अंदाजपत्रक व वार्षिक अंदाजपत्रक इत्यादींना लेखाशीर्षनिहाय मंजुरीची प्रकरणिका सादर करणे, व प्रकरणिका प्राप्त होताच लेखा शाखेस कार्यालयीन आदेशांसह तरतुदी कळविणे.

			श्री. अ. रा. चोथे, वरिष्ठ लिपिक	१) शासकीय/अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत कार्यवाही करणे, शासनाकडे प्रस्ताव पाठविणे २) राज्यमंडळावर विद्यापीठ प्रतिनिधी सदस्यांची नियुक्तीबाबतची कार्यवाही करणे. ३) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय कार्यालयासोबत शासकीय/अशासकीय सदस्यांच्या नावांची शासन राजपत्रात प्रसिद्धीबाबतची कार्यवाही करणे. ४) शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या देयकाच्या प्रतिपूर्तीबाबत कार्यवाही करणे. ५) सर्व विभागीय मंडळात शासकीय, अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत कार्यवाही करण्याबाबत पत्र व्यवहार करणे. ६) माहिती अधिकार अंतर्गत प्राप्त पत्रांवर कार्यवाही करणे. ७) तारांकित/अतारांकित प्रश्नांवरील पत्रांवर कार्यवाही करणे. ८) सभेचा दिनांक व वेळ ठरल्यावर सभेचे नियोजन व आयोजन व्यवस्थितपणे पार पाडणे. सभेस उपस्थित असलेल्या सदस्यांच्या चहापानाची व जेवणाची व्यवस्था करणे. ९) समकक्षता समिती सदस्य नियुक्तीबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे. १०) मंडळ नियमावली अद्ययावत करून देण्याबाबत प्रकरणिका. ११) निविदा सदस्य नियुक्तीबाबत प्रकरणिका १२) वरिष्ठांच्या आदेशानुसार कामे करणे

भांडार विभाग

अ क्र	विभाग	विभाग / उपविभाग प्रमुख	गट– क लिपिक संवर्गातील कर्मचारी	विभागाकडून करण्यात येणारे कामे
०१	भांडार	विभाग प्रमुख श्री. घोडके व्ही. एस. पर्यवेक्षक लिपिक (कार्यासन ४,५,६)		१. भांडार शाखेतील कर्मचाऱ्याच्या कामावर नियंत्रण ठेवणे व कामकाजाचे नियोजन करणे इत्यादी बाबतीत शाखाधिकारी यांना मदत करणे. २. शाखेतील लिपिकांच्या प्रकारणिका तपासून अभिप्रायांसह शाखाधिकारी यांच्याकडे सादर करणे. ३. संबंधितांच्या प्रकरणिकेवरील आदेशानुसार कार्यवाहीचा आढावा घेऊन शाखाधिकारी यांना अवगत करणे. ४. माहिती अधिकार प्रकरणात आवश्यकते नुसार सहकार्य करणे. ५. शाखेत येणाऱ्या टपालवर लिपिकाकडून वेळेत कार्यवाही होण्यासाठी पाठपुरावा करणे.
			कार्यासन क्र.४ व ६ श्रीम. काकडे एस. एस. वरिष्ठ लिपिक	१. जीईएम पोर्टल व डीएससी कीज संदर्भातील सर्व कार्यवाही पूर्ण करणे. २. राज्य मंडळ कार्यालयातील संगणक देखभाल दुरुस्ती व वार्षिक देखभालीचा करार करणे व देयके अदा करणे. ३. कार्यालयातील ई. पी. बी. एक्स. व टेलीफोन दुरुस्ती व वार्षिक देखभाल दुरुस्ती करारनामा करणे व त्याबाबत देयके अदा करणे. ४. टोनर खरेदी करणे व त्याची देयके अदा करणे. तसेच प्रिंटर व टोनर रिफिलिंग करून घेणे व त्याबाबतची देयके अदा करणे. ५. दूरध्वनी, मोबाईल, इंटरनेट, टी. व्ही. इत्यादी सुविधा उपलब्ध करणे व त्याबाबतच्या तक्रारींचे निवारण करणे, मासिक शुल्क अदा करणे आणि इतर आनुषंगिक कामे करणे. ६. संगणक प्रणाली नेट वर्किंग सिस्टीम देखभाल दुरुस्ती व त्यांची देयके अदा करणे. ७. एअरटेल डोंगल खरेदी व इंटरनेट देयके अदा करणे. ८. राज्य मंडळ कार्यालयातील सर्व शाखांसाठी खरेदी करण्यात आलेले लेखन साहित्य चलनानुसार स्वीकारून त्याची नोंद रजिस्टरमध्ये घेणे. तसेच सर्व शाखांच्या मागणीनुसार त्याचा पुरवठा करून त्याची नोंद रजिस्टरमध्ये घेणे. ९. लेखा परीक्षणाच्या वेळी लेखा आक्षेप बाबी संदर्भातील संबंधित कार्यासनांशी निगडित कार्यवाही करणे. १०. गणकयंत्र विभागास मागणीप्रमाणे सर्व्हर उपलब्ध करून देणे, त्याची देयके अदा करणेबाबत कार्यवाही करणे.

			कार्यासन क्र. ५ श्री. तिडके पी. कनिष्ठ लिपिक	१. उत्तरपत्रिका छपाईबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविणे या संबंधित पुढील कार्यवाही करणे. २. बारकोड छपाईबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविणे या संबंधित पुढील कार्यवाही करणे. ३. गुणपत्रक व प्रमाणपत्र छपाईबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविणे यासंबंधीची पुढील कार्यवाही करणे. ४. हॉलोक्राफ्ट छपाईबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविणे यासंबंधीची पुढील कार्यवाही करणे. ५. एस. आर. व ओ. आर. छपाईबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविणे यासंबंधीची पुढील कार्यवाही करणे. ६. पी. पी. बग आणि सील पुरवठ्याबाबत ई-निविदा प्रक्रिया राबविणे यासंबंधीची पुढील कार्यवाही करणे. ७. विभागीय मंडळाकडून विहित नमुन्यात माहिती मागविणे व त्यानुसार पुरवठा करणे. लेखा परिक्षणाच्या वेळी आलेल्या लेखा आक्षेप बाबींसंदर्भात कार्यवाही करणे.
		उपविभाग प्रमुख भांडार शाखा - २ श्री. लहाने एस.डी. (पर्यवेक्षक लि.) (कार्यासन १,२,३)		१. भांडार शाखेतील कर्मचाऱ्याच्या कामावर नियंत्रण ठेवणे व कामकाजाचे नियोजन करणे इत्यादी बाबतीत शाखाधिकारी यांना मदत करणे. २. शाखेतील लिपिकांच्या प्रकरणिका तपासून अभिप्रायांसह शाखाधिकारी यांच्याकडे सादर करणे. ३. संबंधिताच्या प्रकरणिकेवरील आदेशानुसार कार्यवाहीचा आढावा घेऊन शाखाधिकारी यांना अवगत करणे. ४. माहिती अधिकार प्रकरणात आवश्यकतेनुसार सहकार्य करणे. ५. शाखेत येणाऱ्या टपालावर लिपिकाकडून वेळेत कार्यवाही होण्यासाठी पाठपुरावा करणे.

			कार्यसन क्र. -२ श्री पतंगे के. बी. कनिष्ठ लिपिक	१. आवश्यकतेनुसार जंगम मालमत्तांची खरेदी करणे. २. कार्यालयाच्या जंगम मालमता यांची देखभाल व दुरुस्ती करणे त्या आनुषंगिक कामे ३. सर्व विभागीय मंडळांच्या जुन्या इमारतीसंदर्भातील सर्व कामाची कार्यवाही पूर्ण करणे व त्याआनुषंगिक पत्र व्यवहार करणे. ४. विभागीय मंडळांच्या नवीन इमारतींच्या संदर्भातील कार्यवाही करणे ५. इमारतींचे मालमत्ता कर वेळोवेळी आणि वेळेत भरण्यासंदर्भातील कार्यवाही करणे. ६. इमारत दुरुस्ती, रंगकाम, वॉटर प्रुफिंग इत्यादी कामांच्या आनुषंगिक सर्व कार्यवाही करणे. ७. इमारतीमधील वातानुकूलित यंत्रणा, जनरेटर, लिफ्ट, सी. सी. टी. व्ही., अग्निशमन यंत्रणा देखभाल दुरुस्ती याबाबतची सर्व कार्यवाही करणे. ८. सर्व प्रकारच्या स्थावर विद्युत यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीची कामे पूर्ण करणे. ९. राज्य मंडळ प्रशासकीय इमारतीचे वीज देयकांचा वेळेत भरणा करण्याबाबतची कार्यवाही करणे. १०. पुणे विभागीय मंडळाच्या इमारतींमधील तळमजल्यावर युको बँकेस दैनंदिन व्यवहारासाठी भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या जागेच्या भाडे आकारणी बाबत. ११. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांना राज्य मंडळ कार्यालयातील भाडे तत्त्वावर देण्यात आलेल्या जागेच्या भाडे आकारणीबाबत. १२. महानगरपालिकेच्या पाणी देयक नियमित अदा करणेबाबत कार्यवाही करणे नळजोडणीसंबंधी व पाईपलाईनची कामे पाहणे. १३. राज्य मंडळ इमारतीचा विमा उतरविणे व दरवर्षी विम्याच्या हप्त्याची रक्कम कार्यालयीन मान्यता घेऊन भरण्यासंदर्भातील संपूर्ण कार्यवाही करणे. १४. लेखा परिक्षणाच्या वेळी लेखा आक्षेपांसंदर्भातील संबंधित कार्यासनाशी निगडित कार्यवाही करणे. १५. इमारत परिसर सुशोभिकरण करणे, वाहन पार्किंग व नियंत्रण ठेवणे, विद्युत पॅनल बोर्डाची आणि पिण्याच्या पाण्याच्या मीटरची देखभाल व दुरुस्ती करणे आणि देयके अदा करणे. १६. इमारत फर्निचर, दरवाजे व खिडक्या, काचा, इत्यादींची देखभाल व दुरुस्ती करणे आणि त्यांची देयके अदा करणे. १७. सर्व प्रकारच्या विद्युतीकरणयंत्रणाची देखभाल व दुरुस्ती करणे.

			कार्यासन क्र. १ व ३ श्रीम. जांभूळकर आर. एस., कनिष्ठ लिपिक	१. सर्व विभागीय मंडळाकडून प्रशासकीय मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावांबाबत कार्यालयीन मान्यतेसाठी प्रकरणिका सादर करणे. २. सर्व विभागीय मंडळांकडून तीन लाखांपेक्षा अधिक रकमांचे प्राप्त प्रस्ताव का.प समोर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे. ३. 'शिक्षण संक्रमण' अंक छपाई देयकाबाबत कार्यवाही करणे. ४. वेळापत्रक छपाई बाबत कार्यवाही करणे. ५. कार्यालयीन वाहनासाठी आवश्यक इंधन अग्रिम घेणे व समायोजन करणे. ६. वाहन देखभाल दुरुस्ती, इन्शुरन्स नूतनीकरण करणे. ७. कार्यालयीन अधिकारी / कर्मचाऱ्याची यांची ओळखपत्रपत्रे तयार करणे. ८. झेरॉक्स मशीन देयके, कॅलेंडर खरेदी, Fast Tag बाबत कार्यवाही करणे. ९. अतिथिगृह, उपहारगृह इत्यादींबाबत कार्यवाही करणे. १०. कार्यालयीन रद्दीबाबत कार्यवाही करणे. ११. ई- निविदे बाबत कार्यवाही करणे. १२. गणवेश खरेदीबाबत कार्यवाही करणे. १३. राज्यमंडळ कार्यालय तसेच सर्व विभागीय मंडळांसाठी नवीन वाहन खरेदी करणेबाबत कार्यवाही करणे. १४. राज्य मंडळ कार्यालयातील Water Purifier खरेदी तसेच देखभाल दुरुस्ती. १५. राज्यमंडळ कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या नावाचे फलक तयार करणे. १६. कार्यालयात साजरा करण्यात येणाऱ्या महापुरुषांच्या जयंतीसाठी महापुरुष/समाजसुधारक यांचे फोटो खरेदी करणे. १७. कार्यालयात कार्यालयीन कामासाठी वापरण्यात येणारे शिक्के, १८. (Stamp) खरेदी करणे.

परीक्षा विभाग

अ. क्र	विभाग	विभाग प्रमुख / उपप्रमुख	गट क लिपिक संवर्गातील कर्मचारी	विभागाकडून करण्यात येणारे कामे
०१	परीक्षा	विभाग प्रमुख श्री. कुलकर्णी प्र. अ. वरिष्ठ अधीक्षक उपविभाग प्रमुख श्रीमती ववले नि. उ. पर्यवेक्षक लिपिक	कार्यासन परीक्षा – ७ श्री. राम शिंदे वरिष्ठ लिपिक	१. माध्यमिक शालान्त परीक्षा (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र मा.प्र. (इ.१२वी) सर्व कार्यालयांकडून प्राप्त होणारे गुणपत्रिका/प्रमाणपत्र पडताळणीबाबतचे प्रस्ताव संबंधित विभागीय मंडळांना पाठविणे. २. कला, चित्रकला व क्रीडा यासाठी असणाऱ्या सवलतीच्या गुणांसदर्भात विभागीय मंडळांशी व शासनाशी पत्रव्यवहार. ३. मुदतवाढीबाबत तसेच गणकयंत्र विभागाकडून टिप्पणी प्राप्त झाल्यावर विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेशपत्र (इ.१० वी व इ.१२ वी) वितरित करण्याच्या तारखा निश्चित करणे व विभागीय मंडळांना कळविणे व प्रकटन प्रसिद्धिस देणे. ४. प्रवेशपत्र प्रकटन व सर्व विभागीय मंडळाशी पत्रव्यवहार मंडळ कार्यकक्षेतील तक्रार प्रकरणिका व इतर विविध प्रकरणिकांबाबत पत्रव्यवहार करणे. ५. छ.संभाजीनगर व लातूर विभागीय मंडळासंदर्भातील सर्व पत्रव्यवहार, कार्यासनाशी निगडित माहिती अधिकार पत्रे. ६. अधिवेशन काळातील तारांकित/ अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना इत्यादींबाबत कार्यवाही.
			श्रीम.मिसाळ रा.श. वरिष्ठ लिपिक परीक्षा- २	१. माध्यमिक शालान्त परीक्षा (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र मा.प्र. (इ.१२ वी) प्रश्नपत्रिका संपादन सदर्भातील विभागीय मंडळांना विषय वाटप व पत्रव्यवहार तसेच त्रुटींचे निराकरण. २. सेक्टर स्किल कौन्सिल (NSQF) देयक मंजुरीबाबत समग्र शिक्षा कार्यालयाशी पत्रव्यवहार, ३. मुख्य परीक्षापूर्व कार्यवाहीबाबतची कामे. ४. एस.टी. महामंडळ तसेच वीजवितरण महामंडळ यांच्याशी पत्रव्यवहार, परीक्षापूर्व वार्ताहर परिषदेचे आयोजन व प्रकटन, परीक्षा सुरळीत अहवाल शासनास सादर करणे. ५. कार्यासनाशी निगडित माहिती अधिकार पत्रे. ६. अधिवेशन काळातील तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना इत्यादींबाबत कार्यवाही. ७. परीक्षोत्तर निकालासंदर्भात कामे, निकाल वैशिष्टये तयार करणे, प्रकटन, गुणपत्रिका वाटपाबाबत विभागीय मंडळांना पत्रव्यवहार शाखेचे अंदाजपत्रक/वार्षिक खर्च/आठमाही सुधारित अंदाजपत्रक तयार करणे, जून-जुलै पुरवणी परीक्षेबाबतची परीक्षापूर्व व परीक्षोत्तर कामे.

